

MAHARASHTRA TOURISM
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन
बांबू हस्तकला
पालघरच्या जिवंत परंपरेचा अनुभव घ्या

# महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे




# महाराष्ट्राचा सजीव सांस्कृतिक वारसा

महाराष्ट्र हे विविध सांस्कृतिक परंपरांचे समृद्ध विश्व आहे जिथे प्राचीन गुंफा ,शिल्पकला आणि सजीव आदिवासी वारसा एकत्र नांदताना दिसतो. या परंपरेमध्ये पालघर आणि नाशिक जिल्हे विशेषत्वाने वेगळी ओळख जपुन आहेत. सह्याद्रीच्या डोंगर-दर्यात वसलेला हा प्रदेश कोकणा, महादेव कोळी आणि वारली समुदायांच्या पिढ्यान् पिढ्या जपलेल्या परंपरांचे केंद्र आहेत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) पालघर आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये अमूर्त सांस्कृतिक वारशावर (ICH) आधारित अनुभवात्मक पर्यटन विकसित करत आहे. स्थानिक समुदायांच्या सहकार्याने, पर्यटकांना या प्रदेशांचा जिवंत सांस्कृतिक अनुभव घेण्याठी नेहमीच स्वागत करते. वारली चित्रकलेची सृजनशील अभिव्यक्ती, बोहाडा मुखवट्यांचे प्रभावी सादरीकरण, बांबू हस्तकलेची सूक्ष्म कलाकुसर आणि लोकगीतातुन सादर होणाऱ्या नृत्यांच्या मोहक लयी आणि या प्रत्येक अभिव्यक्तीतुन स्थानिय संस्कृतीचा अनोखा अविष्कार प्रकट होतो. बांबु कारागिरांना जंगल व पर्यावरणाचं सखोल ज्ञान आहे. त्यांनी कौशल्यपूर्ण हस्तकलेतुन साकारलेली विविध बांबू उत्पादने, उपयुक्तता आणि कला-सौंदर्याचा अनोखा संगम घडवतात. या परंपरेचे आपण एक साक्षीदार व्हा, कारागिरांकडून कौशल्य शिकून घ्या आणि या समृद्ध वारशाचा एक अनुभव आपल्या सोबत घेऊन जा.

या प्रदेशातील लपलेली सांस्कृतिक रत्ने शोधण्यासाठी आपण एक जिज्ञासेचं पाऊल टाका आणि लपलेल्या सांस्कृतिक सौंदर्याचा अनुभव घ्या! या आणि परंपरा जपणाऱ्या कलावंतांशी थेट संवाद साधा. येथे संस्कृती ही केवळ पाहण्याची गोष्ट नसून, तो एक सामूहिक अनुभव आहे, जिथे लोक-परंपरा स्थान महात्म्य आणि लोक-वारसा एकत्र येऊन महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित उलगडते.







# बांबू हस्तकलेची सजीव भाषा

पालघरमधील महिला कारागीर अनेक पिढ्यांपासुन स्थानिक पातळीवरच्या बांबूपासून, दैनंदिन वापरातील सुंदर आणि उपयुक्त वस्तू तयार करत आल्या आहेत. टोपल्या, साठवणुकीच्या शोभिवंत  वस्तू आणि गृहसजावटीच्या कलात्मक वस्तुंची त्या निर्मिती करतात. प्रत्येक निर्मितीत त्यांचे  निसर्गाविषयीचे सखोल ज्ञान आणि कौशल्यपूर्ण हस्तकलेचा ठसा दिसतो.

आज ही परंपरा काळानुसार विकसित होत आहे—पारंपरिक विणकाम तंत्रांसोबत आधुनिक डिझाइनची अत्तम सांगड घालत, बांबू हस्तकलेला टिकाऊपणा आणि आकर्षकतेचा संयोग घडुन येत आहे.

पर्यटकांना गावांतील कार्यशाळांमध्ये ही प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची आणि कारागिरांशी संवाद साधण्याची संधी मिळते.

# हस्तकला परंपरेचे केंद्रस्थान

पालघरच्या ग्रामीण जीवनात बांबू हस्तकलेचा आत्मा खोलवर रुजलेला आहे, जिथे विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती आणि पिढ्यान् पिढ्यांचे ज्ञान एकत्र येते. या परंपरेचे केंद्र खालील गावांमध्ये आहे:

**घोलवड (डहाणू तालुका)**

**रामनगर (जव्हार तालुका)**








## परंपरेचे वाहक : वारशाचे संरक्षक

या परिसरातलील गावांमध्ये बांबू विणकामाची समृद्ध परंपरा असून, कुशल महिला कारागीर आजही ती जपून ठेवत आहेत. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या या हस्त-कौशल्यातून महिला कारागीर स्थानिक बांबूपासून विविध हस्तनिर्मित वस्तू तयार करतात, ज्या उपयोगिता, सौंदर्य आणि टिकाऊपणा यांचा सुंदर संगम घडवतात.

# बांबु हस्तकला निर्मितीची प्रक्रिया

पारंपारिक कौशल्य आणि कलात्मकतेचा सुरेख संगम यामुळे बांबू उत्पादन तयार करण्याची प्रक्रिया ही अत्यंत नजाकतीची आणि कलात्मक दृष्टीची असते.




**बांबूची निवड –** परिपक्व व नीट वाढलेला बांबू निवडून त्याच्या पातळ -पट्ट्या केल्या जातात.




**पट्ट्या तयार करणे –** पट्ट्या स्वच्छ करून लवचिक बनवल्या जातात.




**रंग देणे व भिजवणे प्रक्रिया –** पट्ट्यांपासून विविध वस्तू तयार केल्या जातात.




**विणकाम व आकार देणे –** बांबुच्या पातळ लवचिक पट्ट्यांना विणकाम करून अंतिम रूप देणे.




**अंतिम प्रक्रिया –** कलात्मक वस्तूला गुळगुळीत करून टिकाऊ बनवले जाते व अंतिम रूप दिले जाते.

# उत्पादने









## दिव्यांच्या आच्छादने



## रोपांसाठी कुंड्या



## सजावटी पूरक वस्तू










# घोलवडचे लोक इतिहास संग्रहालय

घोलवड येथील लोक इतिहास संग्रहालय या प्रदेशाच्या समृद्ध वारशाची ओळख करून देते.

1880 च्या दशकातील ऐतिहासिक शाळेच्या इमारतीत वसलेले हे संग्रहालय विविध सांस्कृतिक अभिव्यक्तींना एकत्र आणते.

येथे वारली चित्रकला, बोहाडा मुखवटे, बांबू हस्तकला, तारपा वाद्ये आणि लोकसंगीत परंपरा पाहता येतात. तसेच पारशी समुदायाचा वारसा, स्थानिक कलाकार आणि ग्रामीण जीवनातील वस्तूंचाही समावेश या ठीकाणी केला आहे.

हे केवळ वस्तूंचे संकलन नसून, लोकजीवनाच्या स्मृती आणि परंपरेचा जिवंत प्रवाह इथे आहे.

या संग्रहालयात या प्रदेशाची भूमी आणि लोकजीवनाच्या कथा जिवंत होतात.







# संस्कृतीचा अक्षय प्रवाह

या प्रदेशात बांबू हस्तकला ही एक 'जिवंत परंपरा' म्हणून आजही बहरत आहे. 'मातीच्या रंगाचे संमेलन' यांसारखे सांस्कृतिक उत्सव आणि सामुदायिक मेळाव्यांमुळे या कलेला सातत्याने बळ मिळत आहे. विविध प्रदर्शने आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून, प्रगल्भ कारागिरांनी साकारलेल्या उत्कृष्ट बांबू कलाकृतींसोबतच, कार्यशाळा आणि कौशल्य-देवाणघेवाण सत्रांतून घडलेल्या नवोदित कलाकारांचे कसबही जगासमोर येत आहे.

# मार्गदर्शन व संपर्क

मुंबई ते डहाणू प्रवास – रेल्वे/रस्त्याने 3–4 तास

- घोलवड – डहाणूपासून 15 किमी (20–25 मिनिटे); बांबू हस्तकला गावांसाठी प्रसिद्ध.
- जव्हार – डहाणूपासून 70 किमी (सुमारे 2 तास); निसर्गरम्य डोंगररांगा आणि समृद्ध हस्तकला परंपरांसाठी ओळखले जाते.

## एका दिवसात बांबू हस्तकलेचा अनुभव

- घोलवड संग्रहालयाला भेट द्या
- घोलवड आणि जव्हारच्या हस्तकला गावांना भेट द्या
- स्थानिक कारागिरांना भेटा
- प्रत्यक्ष विणकाम कार्यशाळेत सहभागी व्हा
- पारंपरिक जेवणाचा आस्वाद घ्या
- हस्तनिर्मित वस्तू सोबत घ्या

शांत समुद्रकिनारे, निवांत विरंगुळा आणि ग्रामीण वातावरणातील फार्महाऊसचा मुक्काम—असा सुखद अनुभव तुम्हाला येथे नक्कीच मिळेल.

### कलाकारांशी संपर्क

यमुना सुरती - 9284052432
कांचन सुरती - 9373441080
निलिशा सुरती - 8652144968
किंजल सुरती - 8956407970
अरुणा सुरती - 9765529917
भावना मायवन्शी – 9359418069





# बांबू हस्तकलेचा सखोल अनुभव घ्या

बांबू हस्तकला गावांना भेट देऊन कारागिरांच्या सहवासात ही कला अनुभवण्याची संधी घ्या—प्रत्यक्ष निर्मिती सत्रे, हस्तकला निवास अनुभव आणि सहनिर्मिती उपक्रमांमधून या प्रक्रियेत सहभागी व्हा.
नैसर्गिक साधनसंपत्ती, पर्यावरणपूरक दृष्टी आणि जिवंत परंपरांवर आधारलेले शाश्वत डिझाइन नवकल्पनांचे मार्ग उलगडा.

डिझाइनर, आर्किटेक्ट आणि खरेदीदारांसाठी:

- कारागिरांसोबत सहनिर्मितीतून बांबू उत्पादने आणि स्थापत्य सजावट साकार करा
- हस्तनिर्मित उपयुक्त आणि सजावटी वस्तूंची निवड करा
- नैतिकतेवर आधारित बांबू निर्मित कॉर्पोरेट भेटवस्तू संकलित करा
- कारागिरांच्या मार्गदर्शनाखालील बांबू कार्यशाळांमध्ये सहभागी व्हा

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

MAHARASHTRA TOURISM

Explore Maharashtra - MTDC

www.heritagevillagesmtdc.com

exploremaharashtra.mtdc

ich@maharashtratourism.gov.in